सहायक कक्ष अधिकारी पदावरुन कक्ष
<u>अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत</u>
**श्रीमती शर्मिला सचिन कदम**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांक : कअप १२२५/प्र.क्र.९४/प्रशा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- १४ ऑक्टोबर, २०२६

## <u>आदेश</u>

मंत्रालयीन विभागातील खालील **सहायक कक्ष अधिकारी** [गट-ब (अराजपत्रित) वेतनश्रेणी एस-१६: रु.४४९००-१४२४००] याना **कक्ष अधिकारी** [गट-ब (राजपत्रित) वेतनश्रेणी एस-१७: रु.४७६००-१५११००] पदावर या आदेशाद्वारे विहित अटींच्या अधीनतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर **स्तंभ-६** मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागामध्ये करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | श्री/ श्रीमती | नाव | व्यक्तीचा प्रवर्ग | सध्याचा विभाग | पदोन्नतीनंतरचा विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | श्रीमती | शर्मिला सचिन कदम **(दिव्यांग-अस्थिव्यंग)** | खुला | ग्रामविकास विभाग | **वित्त विभाग** |

२. **श्रीमती कदम, सहायक कक्ष अधिकारी यांना खालील अटींच्या अधीन राहून कक्ष अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे:-**

१) **सदरची पदोन्नती ही प्रशासकीय निकड म्हणून तदर्थ स्वरुपातील पदोन्नती राहील**.

२) मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०४.०८.२०१७ रोजी पदोन्नतीतील आरक्षणाबाबत शासनाने निर्गमित केलेला दिनांक २५.०५.२००४ रोजीचा शासन निर्णय रद्दबातल ठरविला आहे. सदर निर्णयाविरुध्द शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. त्यामुळे सदरची तदर्थ पदोन्नती राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधीन राहील.

३) सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-आरक्षण-२ यांनी शासन पत्र दिनांक ३०.०७.२०२६ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार, सदर पदोन्नती निव्वळ तदर्थ स्वरुपात व पदोन्नतीसंदर्भातील मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ तसेच अन्य सर्व याचिकांच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४) सदर तदर्थ पदोन्नती, मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र.१८९२/२०२४ तसेच रिट याचिका क्र.१६६३०/२०२५ व इतर संलग्नित याचिकेच्या अधीन राहील.

५) सहायक कक्ष अधिकारी पदावरुन कक्ष अधिकारी पदावर प्रस्तावित सन २०२५-२६ ची निवडसूची तदर्थ स्वरुपाची असून सदर पदोन्नत्या ह्या तदर्थ स्वरुपाच्या आहेत. <u>परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमित पदाचा व सेवा ज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.</u>

६) सदर तदर्थ पदोन्नती प्रतिनियुक्तीवर बाहेर गेलेले अधिकारी रुजू होईपर्यत किंवा पदोन्नतीच्या आदेशापासून ११ महिन्यांसाठी यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी असेल.

७) सदर पदोन्नती तदर्थ स्वरुपाची असून ती केवळ पदोन्नत कोट्यात उपलब्ध होणाऱ्या पदांनुसार नियमित करण्यात येईल.

८) सदर तदर्थ पदोन्नती दिव्यांग आरक्षणाच्या अनुषंगाने सा.प्र.वि., शासन निर्णय, दिनांक २९.०७.२०२४ मधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीनुसार होणाऱ्या बदलाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

९) श्रीमती कदम, सहायक कक्ष अधिकारी यांनी कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/कार्यासन-१२, दि.१२.०९.२०१६ व सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९ मधील तरतूदीनुसार त्यांचे नांव सन २०२५-२६ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल आणि पुढील दोन वर्षी (**सन २०२६-२७ व २०२७-२८**) होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत (**सन २०२८-२९**) कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

१०) श्रीमती कदम यांना कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती ही प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने याबाबतची खातरजमा करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु झाली असल्यास या विभागास अवगत करावे.

११) श्रीमती कदम यांनी या आदेशाच्या दिनांकापासून **तीस दिवसांमध्ये** कक्ष अधिकारी पदावर रुजू होणे आवश्यक आहे. त्यामुळे श्रीमती कदम यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने विहित मुदतीत कार्यमुक्त करावे.

१२) संबंधित विभागाने श्रीमती कदम यांना कार्यमुक्त केलेल्या व कक्ष अधिकारी पदावर रुजू करुन घेतलेल्या आदेशाची प्रत **साप्रवि/प्रशा-२** कार्यासनास तात्काळ पाठविण्यात यावी.

३. महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (कालबध्द प्रशिक्षण) नियम, २०२२ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण घेणे श्रीमती कदम यांना बंधनकारक राहील.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६१०१४१२२१४८३८०७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT PUNDLIK BADGERI

Digitally signed by PRASHANT PUNDLIK BADGERI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=07AE22A8E7FA4047CE6FF816D85E77EEC14DB9926B325A140ACF9B28BB990786, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EC955E2D360E1FDDB6ABAC58A907419053BEECEB5DBAC48A78C89C588FF71BEF, cn=PRASHANT PUNDLIK BADGERI
Date: 2026.10.14 12:22:46 +05'30'

**( प्र. पुं. बडगेरी )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्रीमती शर्मिला सचिन कदम, सहायक कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
......... **(संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)**

**प्रत,**

१) अ.मु.स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अ.मु.स./प्र.स./सचिव, ग्रामविकास विभाग व वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) सह सचिव/उप सचिव (आस्थापना), ग्रामविकास विभाग व वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-सेवा-१/२/३ (१२), प्रशा-१ व प्रशा-३
५) निवड नस्ती/प्रशा-२